# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of illegal Tobaco**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **13/10/2022**

**Brief of the work done :-**

प्रतिबंधित 'सुगंधी तंबाखू'वर पोलिसांचा छापा ; 15 लाखांचा गुटखा जप्त.

# पंधरा लाखांचा अवैध गुटखा पकडला

## मालेगाव पोलिसांची कारवाई; कंटेनरसह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

मालेगाव, दि. १२ (प्रतिनिधी)

**तालुक्यासह संपूर्ण वाशीम जिल्ह्यात प्रतिबंधित गुटख्याची मोठ्या प्रमाणात विक्री सुरु आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी मालेगाव पोलिसांनी केलेल्या नाकाबंदीत कंटेनरमधून नेल्या जात असलेला सुमारे १४ लाखांचा प्रतिबंधित गुटखा पकडला. यावेळी कंटेनरसह ४० लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या कारवाईमुळे खळबळ उडाली असून गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत.**

प्राप्त माहितीनुसार, शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्या विक्री व वाहतूक रोखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांनाकडून अवैध गुटखा विक्री विरोधात मोहिम हाती घेण्यात आली. दरम्यान, मालेगाव पोलिसांची चमु पेट्रोलिंगवर असताना मालेगाव शहरातील बायपासजवळ वाशीमच्या दिशेने जात असलेल्या पीबी १३ एआ-९४६३ या कंटेनरची तपासणी करण्यात आली.



यावेळी कंटेनरमध्ये १४ हजार ७६० किलो वजन असलेले शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित तंबाखूचे ५३६ पोते आढळून आले. पोलिसांनी १४ लाख ७६ हजार रुपयांचा गुटखासाठा, ८० हजार रुपये किंमतीचे पॅराफिन नावाचे लिक्विड व २५ लाख रुपये किंमतीचे कंटेनर असा ४० लाख ५६ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करुन पंचासमक्ष जप्त केला. याप्रकरणी हरयाणा राज्यातील सुडाका येथील कंटेनर चालक मुबारक अकबर यास ताब्यात घेण्यात आले आहे. मालेगाव पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीलकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनात मालेगावचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, एपीआय तानाजी गव्हाणे, परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक गंधे, रवी सैबेवार, कैलास कोकाटे, प्रशांत वाढणकर, गजानन झगरे, अमोल पाटील, विठ्ठल शिंदे या पोलीस पथकाने केली.